# पनवेल महानगरपालिका, पनवेल ४१० २०६

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली मिळकत मौजे- आडिवली येथील राष्ट्रीय महामार्ग (NH४) लगतचा सर्व्हे नं. ३३ पासुन ते मौजे- धरणाकॅम्प येथील सर्व्हे नं. १४ पर्यंतच्या २४.०० मी. रूंदीच्या रस्त्याने बाधीत क्षेत्र पनवेल महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांकडून हस्तांतरणीय विकास हक्काच्या (टी.डी.आर) बदल्यात ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्वेध व निजाखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांनी पनवेल महानगरपालिकेस दिला आहे.

खालील नमूद मिळकतीवर खालीलप्रमाणे जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी, लीज, लीन, चार्ज, इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधितांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत उपसंचालक, नगररचना, पनवेल महानगरपालिका पनवेल ४१० २०६ यांच्या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत कोणचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास खालील मिळकतीवर कोणाचाही कसलाही हक्क वा हितसंबंध नाही असे समजून किंवा असल्यास संबंधिताने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे, असे समजून पनवेल महानगरपालिका जमीन ताब्यात घेईल व सदर जमिनीचा मोबदला टी.डी. आर च्या स्वरूपात खालील जमीनमालकास अदा केला जाईल, त्यानंतर येणाऱ्या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट १) मिळकतीचे वर्णन :- मौजे- धरणाकॅम्प, ता. पनवेल येथील मे. ॲम्बिशिअस डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री. मुकेश केशुभाई ठुमर यांचे मालकीच्या जमीन मिळकतीमधील प्रस्तावित २४.०० मी. रुंदीच्या रस्त्याने बाधीत क्षेत्र पुढीलप्रमाणे :-

१) मौजे- धरणाकॅम्प, सर्व्हे नं. १०/०, क्षेत्र १००९०.०० चौ. मी. त्यापैकी रस्त्यासाठी बाधीत क्षेत्र १४५०.७६ चौ. मी.

त्यास चतु:सीमा खालीलप्रमाणे -

पुर्वेस : सर्व्हे नं. १४, धरणाकॅम्प

पश्चिमेस : सर्व्हे नं. ०८, धरणाकॅम्प

दक्षिणेस : सर्व्हे नं. ०८, धरणाकॅम्प

उत्तरेस : सर्व्हे नं. १३२, धानसर

टिप :- उक्त जागा दर्शविणारा नकाशा पाहणीसाठी नगररचना विभागात ठेवण्यात आला आहे.

उप संचालक नगररचना
पनवेल महानगरपालिका,

जा क्र. -पमपा/नरवि/टिडीआर/२६-२४/९९८/२०२४, दि. ०६/०३/२०२४

टिप - सदरची जाहीर नोटीस पनवल महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

PANVEL MUNICIPAL CORPORATION
पनवेल महानगरपालिका पनवेल-रायगड
PANVEL-RAIGAD

Scanned with CamScanner